# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक

**''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना''**

**MAHADBT पोर्टलवरून योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांना मान्यता देण्याबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' व विविध शिष्यवृत्ती योजनेसाठी आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत त्यांच्या अर्जास मान्यता देण्याचे काम सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे दि. २९/१०/२०१८ ते ३१/१०/२०१८ या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे. तसेच, अद्यापही ज्या महाविद्यालयांच्या Institute Profile ला मान्यता देण्यात आलेली नाही त्यांचे Institute Profile ला मान्यता देण्याचे काम देखील करण्यात येणार आहे.

तरी, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जास मान्यता देऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावे. तसेच शासनाने दिलेल्या सुचनेनुसार Institute Profile मधील आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रासह शासन पत्रासोबत जोडलेल्या विवरणपत्रात उल्लेख केलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित रहावे.

''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' MAHADBT या पार्टलवरून कार्यान्वीत करण्यात आलेली असुन आपल्या महाविद्यालयाचे Institute Profile ला शासनाने दिलेल्या सुचनेनुसार अद्ययावत करून मान्यता घेणे बंधनकारक आहे. याबाबत शासन व विद्यापीठाने वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत तथापी, अद्यापही काही महाविद्यालयांनी याबाबत कार्यवाही करतांना दिसून येत नाही. तरी, अद्ययावत करून जास्तीस जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल याची काळजी घेण्यात यावी. सदर योजनेपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/४५०२
दिनांक : २७/१०/२०१८

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/संस्था.

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - jdhepune@gmail.com

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/ दिनांक - २७ ऑक्टोबर, २०१८

प्रति,

प्राचार्य,

अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित

कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय - MAHADBT पोर्टलवरुन योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांना मान्यता देणबाबत.**

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयांच्या Institute Profile MAHADBT पोर्टलवरुन** मान्यता देण्याचे काम जवळजवळ पूर्ण करण्यात आलेले असून आता आपल्या महाविद्यालयातील/अकृषी व अभिमत विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत त्यांचे अर्जास मान्यता देण्याचे काम दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे. तरी आपल्या महाविद्यालयांतील/अकृषी व अभिमत विद्यापीठातील ज्या विद्यार्थ्यांचे अर्जाला मान्यता देण्यासाठी सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी व वेळेत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. **तसेच अजूनही ज्या महाविद्यालयांच्या Institute Profile ला मान्यता देण्यात आलेली नाही त्यांचे Institute Profile मान्यता देण्याचे कामदेखील उपरोक्त ठिकाणी करण्यात येणार आहे.**

तरी या पत्राद्वारे कळविण्यात येते की **या विभागाच्या अधिपत्याखालील पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यांमधील अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठे यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करुन ती या कार्यालयाकडे मान्यता घेण्यासाठी Forward करावेत आणि या पत्रासोबत जोडलेल्या ठिकाणी, दिनांकास व वेळेत संबंधीत कर्मचा-यांनी न चकुता उपस्थीत रहावे.**

सही/-
(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**सन २०१८-१९ या वर्षातील MAHADBT पोर्टलवरुन योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांना मान्यता मान्यता देण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ दर्शविणारे विवरणपत्र**

| अ. क्र. | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ | महाविद्यालयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | बी वाय के वाणिज्य महाविद्यालय, नाशिक | २९/१०/२०१८ | सकाळी १०.३० वाजल्यापासून | नाशिक शहर आणि निफाड व मालेगाव या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३०/१०/२०१८ | | इगतपुरी, कळवण, चांदवड, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी देवळा या या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३१/१०/२०१८ | | नांदगाव, पेठ, बागलाण, येवला, सिन्नर आणि सुरगाणा या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| २ | अहमदनगर | अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर | २९/१०/२०१८ | सकाळी १०.३० वाजल्यापासून | अहमदनगर शहर आणि अकोले व कोपरगाव या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३०/१०/२०१८ | | जामखेड, नेवासा, पाथर्डी, पारनेर आणि राहता या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३१/१०/२०१८ | | राहुरी, शेवगाव, श्रीगोंदा, श्रीमरापूर, संगमनेर आणि कर्जत या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| ३ | पुणे शहर | अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे | २९/१०/२०१८ | सकाळी १०.३० वाजल्यापासून | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दैनंदिनी २०१८ मधील अ.क्र.१ ते ३५ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये तसेच अ.क्र. १ ते ११ शिक्षणशास्त्र तसेच शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३०/१०/२०१८ | | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दैनंदिनी २०१८ मधील अ.क्र. ३६ ते ६७ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये तसेच अ.क्र. १२ ते २४ शिक्षणशास्त्र तसेच शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३१/१०/२०१८ | | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ दैनंदिनी २०१८ मधील अ.क्र. ६८ ते ९३ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये तसेच अ.क्र. २५ ते ३३ शिक्षणशास्त्र तसेच शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये तसेच **या व्यतिरिक्त जी महाविद्यालये राहिली असतील अशी सर्व महाविद्यालये, तसेच सर्व अकृषी व अभिमत विद्यापीठे** |

| अ. क्र. | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ | महाविद्यालयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ४ | पुणे जिल्हा | प्रो. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, पुणे | २९/१०/२०१८ | सकाळी १०.३० वाजल्यापासून | खेड, जुन्नर, आंबेगाव व मावळ या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये तसेच एस एन डी टी विद्यापीठांची सर्व महाविद्यालये. |
| | | | ३०/१०/२०१८ | | शिरुर, हवेली, दौंड, पुरंदर व इंदापूर या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये. |
| | | | ३१/१०/२०१८ | | बारामती, भोर, मुळशी व वेल्हा या तालुक्यांमधील सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये तसेच पुणे शहर व जिल्ह्यातील सर्व विधी महाविद्यालये. |